# प्रेसनोट

दि.०६/०४/२०२२

## कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ६९/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७, ७अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - २६ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - १) प्रमोद कृष्णराव तुपे, वय - ५४ वर्षे, कार्यकारी अभियंता, कृषी उत्पन्न बाजार समिती, गुलटेकडी, पुणे<br>२) अरविंद दामोदर फडतरे, वय - ४२ वर्षे, उप अभियंता, कृषी उत्पन्न बाजार समिती, गुलटेकडी, पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- रू. (दोन लाख रूपये) |

पडताळणी दिनांक :- १०/०८/२०२१, ११/०८/२०२१, २१/०८/२०२१, २३/०८/२०२१

गुन्हा दाखल दिनांक :- ०६/०४/२०२२

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथील इमारतीच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण व उद्योग भवन क्र. ०१ येथील स्लॅबचे वॉटर प्रुफिंगचे काम केले होते या दोन कामांचे बिलांचे मंजुरीकरीता बिलाच्या १५ टक्के रकमेची लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथील इमारतीच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरण व उद्योग भवन क्र. ०१ येथील स्लॅबचे वॉटर प्रुफिंगचे करणे या दोन कामांचे बिलांचे मंजुरीकरीता यातील आरोपी लोकसेवक क्र.०१ व ०२ यांनी तक्रारदार यांचेकडे २ लाख रूपये लाचेची मागणी केली म्हणून वरीलप्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक विजयमाला पवार यांनी केली असून पोलीस उप अधीक्षक सीमा आडनाईक तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१५. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
१६. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
१७. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
१८. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००.
१९. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
२०. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
२१. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.